# निशाणी क्र.१६ व १७ वरील संयुक्तीक आदेश

(दि.३०.११.२०२३ रोजी घोषीत)

. अर्जदार यांनी मुळ अर्जदार शामलाल राजाराम गुसिंगे यांचे दि.२७.११.२०१७ रोजी निधन झाल्यामुळे त्यांच्या कायदेशीर वारसांना विलंब माफीसह प्रकरणात समाविष्ट करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे नुसार ते मुळ अर्जदार शामलाल राजाराम गुसिंगे यांचे कायदेशीर वारस आहेत. परंतु ते ग्रामीण भागात राहणारे असून त्यांना कायदयाचे पुरेसे ज्ञान नसल्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल करण्यास ०४वर्षे,०७महिना व १० दिवस ईतका विलंब झालेला आहे. अर्जदारास प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी मंजूर केल्यास गैरअर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी सदर प्रस्तावित दुरुस्ती केल्यास न्यायनिर्णयावेळी मदतच होईल. करीता अर्जदाराचा सदर अर्ज मंजूर करुन प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी देण्याची त्यांनी विनंती केली.

३. गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी प्रस्तुत अर्जामध्ये विलंबाचे कारण स्पष्ट केले नसल्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्यास विनंती केली.

४. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ यांचा मौखीक युक्तीवाद ऐकला.

५. मुळ अर्जदार यांनी मौजे राजेवाडी साठवण तलावासाठी त्यांची गट नं.९३,९५,९६ व १०४ मधील जमीन व फळझाडे संपादीत झाल्यामुळे वाढीव

मोबदला मिळण्यासाठी प्रस्तुत प्रकरण दाखल केले. प्रस्तुत प्रकरण दि. २८.०८.२०२० रोजी न्यायालयाकडे पुढील कार्यवाही करण्यासाठी भू–संपादन कार्यालयाकडून आलेले दिसून येते. त्यामुळे त्यापूर्वी अर्जदारांना प्रकरणात त्यांची नावे समाविष्ट करुन घेण्याची कोणतीही संधी मिळाल्याचे दिसून येत नाही. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जात विलंबाचे कारण सुध्दा नमूद केलेले आहे. यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे संपादीत झालेल्या जमीनीचा वाढीव मोबदला मिळण्यासाठी मुळ अर्जदार शामलाल राजाराम गुसिंगे यांनी प्रकरण दाखल केलेले आहे. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत अर्जदारास प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास गैरअर्जदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही,याउलट दोन्ही पक्षांना प्रकरण गुणदोषावर निकाली काढण्यास मदतच होईल. करीता अर्जदारांचे अर्ज मंजूर करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१ अर्जदार यांचे निशाणी क्र.१६ व १७ वरील अर्ज रु.५००/– खर्च जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,जालना यांचे कार्यालयात भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहेत.

२ अर्जदारांना मुळ अर्जदार शामलाल राजाराम गुसिंगे यांच्या वारसांच्या नावाची प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

३ अर्जदारांना प्रस्तुत प्रकरणात समाविष्ट होण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

४ अर्जदारांनी निशाणी क्र.१६ नुसार प्रस्तावित दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्ती निर्देशन अर्जाची प्रत पुढील तारखेला दाखल करण्यात यावी.

५ आदेशाप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

(श्रीमती माधुरी रा.खनवे)
दि.३०.११.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर)
जालना

**प्रमाणपत्र**

खालीलप्रमाणे निवेदन करण्यात येते की,सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–देशमुख शिरीष दि.
न्यायालयाचे नाव :–सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना.
पी.डी.एफ.दिनांक :–दि.३०.११.२०२३

लघुलेखक(म.)